# स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख

प्रकल्प कार्यालय :- स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख.
‘श्रमसाफल्य’ मधलीआळी,
देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

भ्रमणध्वनी क्रमांक :- १) सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे - अध्यक्षा, स्नेह समृध्दी मंडळ.
९७६९२५२९४०, ९४२३२९३४९१.
२) श्री. अनिल विनायक कुडाळकर - मुख्य कार्यकारी अधिकारी.
७५२२९४०००३, ९४२०१५६९५३.

ई.मेल :- ssmdevrukh@gmail.com
snehsamruddhi@yahoo.co.in

नोंदणी क्रमांक :- एफ ११८२ (पब्लिक ट्रस्ट) १९९४ (सोसायटी)

नोंदणी दिनांक :- १६ ऑगस्ट १९९३ रत्नागिरी, महाराष्ट्र,

कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य.

संस्थापक :- श्री. रामचंद्र प्रभाकर देशपांडे.

विश्वस्त सूचि :-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे | अध्यक्ष |
| २. | सौ. शैलजा शांताराम कांगणे | उपाध्यक्ष |
| ३. | सौ. सुजाता आशिष प्रभुदेसाई | सचिव |
| ४. | सौ. दिपाली दिलीप कानडे | खजिनदार |
| ५. | सौ. दिपश्री दिलीप बोकील | सदस्य |
| ६. | सौ. युगंधरा रविंद्र आठल्ये | सदस्य |
| ७. | सौ. कविता आनंद नायगावकर | सदस्य |

संस्थेचे ध्येय :- समानतेच्या तत्वावर आधारित महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रीत करुन समाजातील सर्व घटकांचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणे.

ध्येय साध्य करण्यासाठी हाती घेतलेले उपक्रम :-

वरील ध्येय प्राप्त करण्यासाठी महिला, युवक आणि पुरुषांकरीता विविध प्रकारचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिक तसेच समुपदेशनासाठीचे प्रकल्प विविध व्यक्ती, संस्था आणि शासन यांच्या सहकार्याने आयोजित करणे.

## संस्थेची रचना

अध्यक्ष

↓

विश्वस्त

↓

मुख्य कार्यकारी अधिकारी

↓

कर्मचारी

## संस्थेचा महिला आणि शेती असा प्रवास

स्नेह समृध्दी मंडळ या संस्थेची १९९२ मध्ये स्थापना करण्यात आली. ग्रामीण महिला आणि त्यांची कूटुंबे यांच्यासाठी काम करीत असताना, संस्थेला शेती या घटकाकडे दुर्लक्ष करणे शक्यच नव्हते. आपल्या देशाची लोकसंख्या वाढीची सरासरी लक्षात घेवून वाढत्या लोकसंख्येला असणारे अन्न उपलब्ध व्हावे याकरीता शासनाने विविध उपाययोजना आणल्या. त्यातीलच एक भाग म्हणून साधारणतः १९८५ च्या दरम्याने शेतकरी उत्पन्न वाढीसाठी रासायनिक खते, औषधे, संकरीत बियाणी, आधुनिक यंत्रे त्याचबरोबर तंत्र यांचा उपयोग करु लागला. उत्पादन खर्च कमी आणि उत्पन्न जास्त यामुळे आपोआपच हा शेतकरी या परिवर्तनाच्या अधीन झाला. बदल केल्यामुळे जाणवलेले चांगले परिणाम हे दुरोगामी ठरु शकले नाहीत. अलिकडच्या काळात यामुळे शेतक-याला आणि शेतीला अनेक संकटांनी व्यापले त्याचा विपरीत परिणाम माणूस आणि पर्यावरण या दोन्हींवर झाला. आधुनिक पध्दतीने उत्पादित केलेल्या मालाचे अन्नाद्वारे आपण सेवन केल्यामुळे माणसाची प्रतिकारशक्ती कमी झाली आहे. नवनवीन गंभीर स्वरुपाचे आजार आणि रोगांनी मानवाला ग्रासले आहे. रासायनिक घटकांच्या वापराने जमिन (माती), पाणी, हवा, झाडे, पाऊस, तापमान, ऋतूचक्र या सर्वांवरच याचा विपरित परिणाम झाल्याचे जाणवते. त्याचबरोबर आधूनिक तंत्रामुळे एक प्रकारे श्रमजीवी संस्कृतीच लोप पावण्यास सुरुवात झाली आहे की काय असे जाणवत होते.

शेतीप्रधान देशातील शेतीचे हे चित्र पहायला मिळाल्यानंतर हा प्रकार म्हणजे एक प्रकारे शेती, शेतकरी आणि पर्यावरण यांचा -हास सुरु असल्याचे जाणवले. याचा विचार करुन संस्था काम करीत असलेल्या आणि शेतीशी जास्तीत जास्त संलग्न असणा-या ४० गावांमध्ये संस्थेने याबाबत अधिक अभ्यास केला. त्यातून लक्षात आले की हे चित्र बदलुन पुन्हा शेती-शेतकरी आणि पर्यावरण हे संपन्न करावयाचे असेल तर निसर्गाच्या सानिध्यात त्याच्याशी सांगड घालून शेती करणे आवश्यक आहे. प्रथम कार्यक्षेत्रातील १० गावे निवडून त्यांच्यासाठी २००५ पासून संस्थेने काम करायला सुरुवात केली. त्यामध्ये पुढील सहयोगी यंत्रणांचे सहकार्य संस्थेला लाभले.

# स्वीस एड् इंडिया यांच्या मार्फत विकास सहयोग प्रतिष्ठान, मुंबई

छोटे शेतकरी ज्यांच्याकडे जमिन अल्प आहे, साधने कमी आहेत, आर्थिक दुर्बल आहेत. आणि ज्यांचे शेतीवरच जीवनमान अवलंबून आहे अशा शेतक-यांसाठी २००७ पासुन "शेती वाचवा - शेतकरी वाचवा" हे अभियान संस्थेने कार्यक्षेत्रातील १० गावांमध्ये राबविण्यास सुरुवात केली. त्यामध्ये शेती आणि शेतकरी यांची परिस्थिती आणि भविष्य याविषयी जागृती करणे, निसर्ग शेतीचे (निसर्गतः उपलब्ध असणा-या साधन- संपत्तीचा शेतीमध्ये अधिकाधिक उपयोग करणे मात्र पर्यावरण समतोल राखून) तंत्र शेतक-यांपर्यंत विविध प्रशिक्षणांच्या माध्यमातून पोहोचविणे, सेंद्रीय शेती पध्दतीने प्रायोगिक तत्वावर शेतक-यांनी प्रयोग करावेत याकरीता प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे, सेंद्रीय खते, स्थानिक वाण, सेंद्रीय औषधे यांची निर्मीती करण्याचे कौशल्य शेतक-याला शिकविणे, मातीचा पोत सुधारणे, पाणी संवर्धन, जमिनीची धुप थांबविणे, आगीचे प्रमाण नियंत्रणात आणणे, सरकारी धोरणे योजना समजुन घेणे याकरिता विविध जागृतीचे कार्यक्रम राबविणे अशा प्रकारचे उपक्रम या कार्यक्रमामध्ये सदर यंत्रणेच्या सहकार्याने केले. यामधून कार्यक्षेत्रातील आज सुमारे १०० कुटुंबांमध्ये सेंद्रीय पध्दतीने भाजीपाला लागवड केली जाते. आणि सुमारे ४० ग्रामीण महिला भाजीविक्री करुन आपल्या कुटूंबाचा आर्थिक भार कमी करण्यामध्ये मदत करीत आहेत.





# सेंद्रीय शेतीचे महत्व पटवून देऊन सेंद्रीय खत आणि सेंद्रीय खताचा वापर करुन भाजीपाला लागवड व विक्री













# बचतगट भातलागवड, हंगामी पिके व कोळपणी अवजाराचे प्रात्यक्षिक







# कार्यक्षेत्रातील महिला शेतकरी शिबिरे, कार्यशाळा आणि मेळावे यांचे आयोजन















## तालुका कृषी अधिकारी (तालुका कृषी विभाग, महाराष्ट्र शासन)

गावांमध्ये शासनाच्या मदतीने बायोगॅस तयार करण्याचे प्रात्यक्षिक उभे कसे होते, त्यामध्ये बचतगटांच्या माध्यमातून प्रायोगिक तत्वावर काम केले आहे. २००७ मध्ये शासनाच्या सेंद्रीय शेती कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत सेंद्रीय शेती प्रशिक्षण कार्यक्रम आणि निविष्ठा वाटप उपक्रम १० गावांमध्ये २५० शेतक-यांकरिता घेण्यात आला. त्यामध्ये सेंद्रीय शेती तंत्राचे एक दिवशीय प्रशिक्षण शेत-याला देवून प्रत्येकी १ या प्रमाणात बी. डी. कंपोस्ट कल्चर आणि ई.एम. द्रावण या निविष्ठांचे वाटप करण्यात आले त्याचा उपयोग सदर शेतक-यांनी शेतीमध्ये केल्याने त्याचे उत्पन्न वाढण्यास निश्चितच भर पडली. सद्यस्थितीत त्यातील बहूतांश शेतकरी या निविष्ठा आपल्या शेतीत वापरत आहेत. सन २००८ मध्ये ५ आणि सन २००९ मध्ये २५ अशा एकूण ३० महिला शेतकरी बचत गटांना एकूण १,५०,०००/- एवढा या यंत्रणेकडून सक्षमीकरण अनुदान योजने अंतर्गत लाभ मिळाला होता. याचा सदर गटांनी सामुहिक शेतीमध्ये विविध प्रयोग करण्यासाठी उपयोग केला.

संस्थेच्या प्रयत्नातून आणि शासनाच्या माध्यमातून २,१०,०००/- एवढे अनुदान शेतक-यांपर्यंत पोहोचले होते. त्यातील १,५०,०००/- एवढे अनुदान हे खेळते भांडवल स्वरुपात शेतकऱ्यांनी वापरल्याने त्याची उपयुक्तता निश्चितच वाढली. आजवर शेतक-यांनी केलेल्या प्रयोगातून शेतमाल आणि निविष्ठा (खते, औषधे, बियाणी) यातून अंदाजे ७५ शेतक-यांना आर्थिक लाभ झाला आहे. शिवाय पोषक अन्न निर्मिती झाली आहे. त्याचबरोबर ५०० शेतक-यांमध्ये कमी-जास्त प्रमाणात निर्माण झालेली जागरुकता आणि त्यांना शिकविण्यात आलेले योग्य तंत्रज्ञान यामुळे कार्यक्षेत्रातील (४० गावातील) सर्व शेतक-यांसाठी त्यांच्या निर्माण झालेल्या क्षमतेचा उपयोग होत आहे.





## सर दोराबजी टाटा ट्रस्ट मुंबई, (SDTT) अंतर्गत कार्यक्रम

संस्थेने शेती आणि शेतकरी यांच्या विकासासाठी काही ठोस उपक्रम हाती घेतले, कार्यक्षेत्रातील ६ गावांमध्ये रिसोर्स मॅपींग करण्यात आले. त्यामध्ये ३९४ कुटूंबांचा सर्वे करण्यात आला. आणि त्यानंतर सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई यांच्या सहाय्याने सुधारित बांबू लागवड हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पर्यावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढावे, मातीचा नाश होऊ नये आणि ग्रामीण समुदायाला रोजीरोटीची संधी मिळावी या उद्देशाने संस्थेने सन २०१३ ते २०१६ मध्ये बांबू वृक्षारोपण प्रकल्प हाती घेतला.

## बांबू वृक्षारोपण प्रकल्प

सर दोराबजी टाटा ट्रस्ट मुंबई, (SDTT) पुरस्कृत सुधारित बांबू लागवड प्रकल्प संस्थेने हाती घेतला. कोकण भागामध्ये बांबू वृक्षाबद्दल नाविन्य नाही. अनेक स्थानिक प्रजाती कोकणात पूर्वापार प्रचलित आहेत. असे असले तरी ग्रामीण भागातून शहराकडे होत असलेल्या स्थलांतरामुळे अन्य शेतीव्यवसायाप्रमाणे बांबूकडेही बऱ्याच अंशी दुर्लक्ष होत आहे. व त्याकडे नव्याने पाहण्याची आवश्यकता भासत आहे. बांबूपासून टोपल्या, सुपे इ. पारंपारिक कारागिरीच्या वस्तू तसेच घरबांधणी, कुंपण इ. साठी त्याचा वापर होत असतोच. शहरामध्ये तसेच ग्रामीण भागामध्येही आधुनिक बांधकामांमध्ये परातीसाठी, मंडपांसाठी तसेच व्यावसायिक भाजीपाला उत्पादनामध्ये आधारासाठी बांबूची मागणी प्रचंड प्रमाणात आहे. दक्षिण कोकणातून मोठया प्रमाणावर बांबूची तोड त्या कारणामुळे होत आहे. बांबूपासून तयार केलेले नवीन प्रकारचे हस्तकला, फर्निचर नाविण्यपूर्ण घरबांधणी इ. गोष्टीही चांगल्याच लोकप्रिय होत आहेत. बांबूचे पारंपारिक उपयोग जरी कमी होत असले तरी त्यांच्या नवीन उपयोगांमुळे बांबू महत्व अशाप्रकारे वाढत आहे व त्याची मागणीही बाजारात वाढत आहे.

बांबुची मागणी वाढत असल्यामुळे उपलब्ध बेटांमधून मोठया प्रमाणावर बांबू काठया काढल्या जात आहेत. अशाच प्रकारे बांबू बेटांची तोड चालू राहिली तर असलेला बांबू स्त्रोत नष्ट होऊ शकेल. भारतामध्ये बऱ्याच प्रातांमध्ये बांबू हा जगत उत्पादन म्हणून घेतला जातो. त्यामूळे त्याची नवीन लागवड फारशी होत नाही. कोकणाचा विचार केला तर बांबू बेटांची लागवड व जोपासना पुर्वापार येथील शेतकरी वर्ग करीत होता. परंतु गेल्या ३० वर्षांमध्ये बांबूची नवीन लागवड होण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या घटले आहे. असे येथील लोकांशी चर्चा केल्यावर लक्षात आले. बांबूची वाढती मागणी व लागवडीतून मिळणारे आर्थिक लाभ पाहिल्यास बांबूच्या लागवडीचे महत्व नक्कीच प्रकर्षाने पुढे आले. बांबूपासून पाच वर्षांनी आर्थिक उत्पन्न मिळणे सुरुवात होते. चांगले व्यवस्थापन असलेल्या बेटांपासून ८ व्या वर्षांपासून पुढे सरासरी १० काठया मिळणे शक्य असते. साधारणतः ३० अधिक वर्षांपर्यंत

उत्पादन मिळते. साधारणतः एक एकर क्षेत्रावर ४४० बेटे धरल्यास त्यांच्या लागवड व व्यवस्थापनासाठी येणारा खर्च वजा जाता दरवर्षी सरासरी एकूण आर्थिक उत्पन्न रु. ९३,०००/- पर्यंत मिळणे अपेक्षित होते.

त्यामुळे अशाप्रकारे बांबू लागवडीचे महत्व लोकांना पटवून देणे अतिशय सोयीचे झाले. यातुनच बांबू रोपांची लागवड व विक्री यादृष्टीकोनातून नर्सरी तयार करण्यात आली. एका बचतगटाच्या अंतर्गत ११ महिलांनी हे नर्सरी युनिट सुरु केले यातुन २८६७ बांबू रोपे तयार केली. व त्यांची कार्यक्षेत्रामध्ये विक्री केली. साधारणतः माणगा या बांबूच्या प्रकाराचे चांगले व्यवस्थापन केल्यास व नियमित सेंद्रीय खतांचा पुरवठा केल्यास तीस वर्षे उत्पादन देऊ शकते. जेणेकरुन गावांमध्ये मोठया प्रमाणावर बांबूचा एक मोठा शाश्वत स्त्रोत तयार होईल व त्यांचा येथील ग्रामीण जनतेच्या विकासासाठी उपयोग होऊ शकतो. बांबू लागवडीसाठी विविध शासकीय विभाग उदा. कृषि विभाग, वन विभाग तसेच सामाजिक वनीकरण विभाग हयांच्याकडे असलेल्या योजनाही लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहेत.

बांबूंची वरकस लागवड आणि परसबाग लागवड अशा दोन प्रकारे करण्यात आली. त्यामध्ये -

१) वरकस लागवडीमध्ये एकूण ६२ शेतकऱ्यांनी ४४४२ रोपांची लागवड केली.
२) परिसरबाग लागवडीमध्ये एकूण १७७ शेतऱ्यांनी ९९५ रोपांची लागवड केली.यामध्ये १६ बचतगट आणि २७ वैयक्तिक शेतकरी यांचा समावेश होता.











नर्सरी युनिट


# मसाला पिके लागवड

सर दोराबजी टाटा ट्रस्ट मुंबई, यांच्या मार्फतबांबू लागवडीच्या जोडीने मसाला पिके लागवड अंतर्गत २१३ शेतकऱ्यांनी १४४४ काळीमिरी व दालचिनी या मसाले पिकांची लागवड केली. यामध्ये १२ बचतगटांचा आणि ६२ वैयक्तिक शेतकऱ्यांचा समावेश होता.








# पाणीस्रोत विकास कार्यक्रम

ग्रामीण भागात अनेक ठिकाणी विशिष्ट नैसर्गिक स्थितीमुळे कायमस्वरुपी वाहणारे पाणीस्रोत उपलब्ध असतात. मात्र लोकांच्या दुर्लक्षामुळे त्यांची अवस्था बिकट होत झालेली असते. परिणामी त्यांचे उपयोग मर्यादित होत जातात. अशांपैकी ज्या स्त्रोतांचा लोकांच्या सहकार्याने विकास करणे सोयीचे आहे आणि ज्यांची उपयुक्तता अधिक आहे. असे स्रोत निवडून त्यांचा विकास करता येईल. यामध्ये पर्यावरणाला कोणताही धोका निर्माण होणार नाही याची दक्षता बाळगुन स्रोतांची खोदाई करणे, स्वच्छता करणे, सुरक्षित बांधकाम करणे त्याचबरोबर बांधकामानंतरही तो स्रोत वाहता राहील अशी बांधकामाची रचना ठेवणे याबाबींचा विचार करुन पाणीस्रोत विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला. यामध्ये आवश्यक असणारे बांधकाम साहित्य आणि प्रत्यक्ष बांधकाम (कुशल मजुरांचे) यासाठी आवश्यक असणारे आर्थिक सहकार्य सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई यांच्यासोबतच्या सुधारित बांबु लागवड प्रकल्पाअंतर्गत करण्यात आले.

कार्यक्षेत्रातील गावांमध्ये नैसर्गिकरित्या पाणीसाठा असलेल्या जागेचा विकास करण्यात आला. ज्याचा पिण्यासाठी पाणी, जनावरांसाठी पाणी तसेच शेतीसाठी पाणी असा याचा उपयोग होत आहे. साधारण ४३ कुटूंबांना याचा उपयोग झाल्याचे दिसते आहे.



# गावांमधील पाणीस्रोतांची पूर्वीची स्थिती आणि बांधकामानंतरची स्थिती

















# शेतकरी अभ्यास सहल - चिपळूण, रायगड, सिंधुदूर्ग, दापोली, राजापूर आणि केरळ




















# ग्रामीण कौशल्यवृद्धीतून समृद्धीकडे..

देवरुख (ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) येथील स्नेह समृद्धी संस्थेचे बावीस वर्षांपासून कार्य सुरु

महिलांचे स्वयंपूर्ण बचत गट

पर्यावरणपूरक शेती

अन्न व फळप्रक्रिया आधारित रोजगार

स्नेहसमृद्धीची स्थापना

संस्थेचे उद्देश

ग्रामरोजगारासाठी कौशल्य विकसन

## आपण आमच्या संस्थेला खालीलप्रमाणे मदत करु शकता.

१) शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक मदत.

२) विविध उपक्रमांसाठी वेळोवेळी आवश्यक असलेले सल्ला व मार्गदर्शन.

३) शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवित असताना आवश्यक असलेले आधुनिक तंत्रज्ञान किंवा उपकरणे पुरविणे.

४) शेतीसाठी आवश्यक बि-बियाणे, किटकनाशके, खते यांचा पुरवठा करणे.

आपल्या सुचनांचे आम्ही स्वागतच करु. कृपया आमच्या संस्थेच्या संपर्कात रहावे, ही विनंती.

## संपर्कासाठी वैयक्तिक भ्रमणध्वनी क्रमांकः-


सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे
अध्यक्षा
९७६९२५२९४०, ९४२३२९३४९१.

श्री. अनिल विनायक कुडाळकर
मुख्य कार्यकारी अधिकारी
७५२२९४०००३, ९४२०१५६९५३.